नि ३६

मे. प्रमूख जिल्हा न्यायाधीशसाहेब ओरोस – सिंधुदुर्ग यांचे न्यायालयात.

दिवाणी किरकोळ अर्ज नं. 18 /2024

**श्री. दत्तात्रय विष्णू राळकर व. २ --- अर्जदार**

**विरुद्ध**

**श्री. देवेंद्र राधाकृष्ण वस्त व. ७ --- सामनेवाले.**

सदरकामी अर्जदारतर्फे विनंती अर्ज असा की,

सदर अर्जाचे कामी अर्जदारतर्फे देण्यात आलेले नि. 23, 24 वरील अर्ज हे अर्जदार यांनी मृत्तक सामनेवाली नं. 4 चे वारस नं. 4अ ते 4क यांना खर्चाची एकूण रक्कम रु 1,200/- यांना अदा करण्याच्या शर्तीवर मंजूर केले आहेत. व सदरप्रमाणे खर्चाची रक्कम मृत्तक सामनेवाली नं. 4 चे वारस नं. 4अ ते 4क यांना अदा केल्यानंतर 14 दिवसाचे आत मुळ अर्जात दुरुस्ती करुन त्याची दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करण्याचा व सामनेवाले यांना पुरविण्याचा आदेश केलेला आहे.

अर्जदार नं. 2 ही कर्करोगाने आजारी असून तिचे करीता अर्जदार नं. 1 हा कुलमुखत्यारी म्हणून काम पाहात आहे. अर्जदार नं. 1 हा देखील वयोवृद्ध असून त्याची हृदय रोगाची शस्त्रक्रीया झालेली आहे. त्यामुळे अर्जदार यास त्याच्या वृद्धपणामुळे व हृदय रोगाच्या आजारपणामुळे नि. 23 ते 25 वरील मे. न्यायालयाच्या आदेशाची पूर्तता करण्याचे अनुशंगाने मुदतीत आपल्या वकीलांची भेट घेणे शक्य झाले नाही. त्यामुळे अर्जदार यास सदर आदेशांची पूर्तता मुदतीत करणे शक्य झालेले नाही. सदरप्रमाणे मुदतीत आदेशाची पूर्तता न करण्यामागे अर्जदार यांचा कोणताही निष्काळजीपणा कारणभूत नाही. सबब न्यायपूर्ततेसाठी मे. न्यायालयाच्या नि. 23 ते 25 वरील आदेशाची पूर्तता करणेसाठी अर्जदार यांना जो विलंब झालेला आहे तो माफ करुन अर्जदार या अर्जासोबत नि. 23 व 24 वरील आदेशाप्रमाणे अदा करीत असलेली खर्चाची रक्कम मे. न्यायालयात जमा करुन घेणेत यावी व नि. 25 वरील आदेशाप्रमाणे मुळ अर्जात दुरुस्ती करण्याची परवानगी देणेत यावी अशी अर्जदार यांची नम्र विनंती आहे.

Considering the reason assigned to comply order below Exh. 23&24 subject to payment of costs of Rs. 300/- to be paid to the respondents equally.

LR's

D

PD3
7/7/25

ओरोस-सिंधुदुर्ग,

दिनांक: 16/06/2025

श्री. दत्तात्रय विष्णू राळकर
अर्जदार नं. 1 स्वतः व नं. 2 करिता कुलमुखत्यारी

**रिपोर्ट सहायक अधीक्षक (वित्त) यांचा असा की,**
खर्चाची रक्कम **रक्कम**
**रु.** 300/- (रु. तीनशे मात्र)
**सी.नं./जी.नं.** 58 **दि.** 07/07/2025
**येथे जमा आहे. पुढील आदेश होणेस विनंती आहे.**

07/7/25
**सहायक अधीक्षक (वित्त)**
**जिल्हा व सत्र न्यायालय, सिंधुदुर्ग-ओरोस**

Received cost of Rs. 300/- (Rs. Three Hundred only)

07/7/2025
सहायक अधीक्षक (वित्त)
जिल्हा व सत्र न्यायालय
सिंधुदुर्ग-ओरोस

## प्रतिज्ञापत्र

मी, श्री. दत्तात्रय विष्णू राळकर, वय सुमारे ७३ वर्षे, धंदा शेती व सेवानिवृत्त, राहणार मु. पो. आजगाव - धाकोरे, तालुका सांवतवाडी, जिल्हा सिंधुदुर्ग माझे स्वत:करीता व अर्जदार नं. २ हिचा कुलमुखत्यारी म्हणून तिचे करीता सत्य प्रतिज्ञेवर सांगतो की, वर नमूद अर्जातील संपूर्ण मजकूर हा मी वाचुन पाहिलेला असून तो माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केले प्रतिज्ञापत्र.

ओरोस-सिंधुदुर्ग,
दिनांक: 16/06/2025.

श्री. दत्तात्रय विष्णू राळकर

सही करणार यांस मी ओळखतो

ॲड. एस. बी. प्रभु खानोलकर